# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.03.2026** **वारःबुधवार**

१. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, विधानपरिषदेतही बहुमतानं मंजूर
२. पुढील पाच वर्षांत विजेचे दर वाढण्याऐवजी कमी होत जातील-मुख्यमंत्र्यांची ग्वाही
३. रबी हंगामासाठी पीक पाहणीकरिता ३१मार्चपर्यंत मुदतवाढ
४. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ॲग्री हॅकेथॉनचं १५ मेपासून पुण्यात आयोजन
५. ज्येष्ठ कवयित्री आसावरी काकडे यांचं निधन आणि
६. विविध जिल्ह्यांमध्ये वादळी वारे, गारांसह पाऊस, आजही अशाच हवामानाचा इशारा

धर्मस्वातंत्र्य

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, 2026 काल विधानपरिषदेतही बहुमतानं मंजूर झालं. या विधेयकाचा उद्देश कुठल्याही एका धर्माला लक्ष्य करणं हा नाही. केवळ हिंदू-मुस्लिम यादृष्टीनं याकडे बघू नये. सर्व धर्मांसाठी ते समानच राहील, अशी ग्वाही गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी या विधेयकावरच्या चर्चेच्या उत्तरात दिली. हे विधेयक स्वेच्छेनं होणारं धर्मांतर थांबवत नाही, कोणाच्याही धर्मस्वातंत्र्यावर घाला घालत नाही, केवळ गैरमार्गानं केलं जाणारं धर्मांतर थांबवणं हा या विधेयकाचा हेतू आहे, असं त्यांनी सांगितलं. राज्यघटनेनं दिलेलं धर्मस्वातंत्र्य हे निरंकुश नाही, चुकीच्या गोष्टी होत असतील, तर त्यासाठी कायदा करायचा अधिकार सरकारला आहे, असं ते म्हणाले. धर्मांतर नक्की स्वेच्छेनं होत आहे ना, याची खात्री करण्यासाठी 60 दिवसांची अग्रिम सूचना देण्याची आणि धर्मांतर झाल्यानंतर 21 दिवसांच्या आत तशी माहिती स्थानिक संबंधित अधिकाऱ्यांना कळवण्याची सक्ती यात केली आहे. अनेकदा पीडित व्यक्तीमध्ये स्वतःवरच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची ताकद नसते. म्हणून नातेवाईकांना तक्रार दाखल करायचा अधिकार यात दिला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी विधेयकाच्या विरोधातला प्रस्ताव मागं घेतला. त्यानंतर सभागृहानं आवाजी मतदानानं विधेयक मंजूर केलं.

वीजविधानसभा

महाराष्ट्र महावितरण कंपनीने १ लाख कोटी रूपयांचा वार्षिक महसुलाचा टप्पा पार करून देशातील सर्वात मोठी कंपनी होण्याचा मान मिळवला असून महावितरणनं केलेल्या उपाययोजनांमुळं पुढील पाच वर्षांत विजेचे दर वाढण्याऐवजी दरवर्षी कमी होत जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली. सौर ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे आता राज्यातील उद्योगांना, सकाळी ९ ते ५ वीज वापरल्यास २५ टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. पूर्वी रात्री वीज शिल्लक असल्यानं १२ ते ६ या वेळेत वीज वापरासाठी सवलत दिली जात असे असंही ते म्हणाले.

राज्य सरकारनं रबी हंगामासाठी पीक पाहणीसाठी मुदत ३१मार्चपर्यंत वाढवली आहे. राज्यात आतापर्यंत केवळ ५५ टक्के क्षेत्राची पाहणी पूर्ण झाल्यानं सरकारनं हा निर्णय घेतल्याचं निवेदन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानसभेत दिलं. ते म्हणाले..

<u>अंमलीविधानसभा</u>

राज्यातल्या मोठ्या शहरांमधील अमली पदार्थांच्या जाळ्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनानं कठोर पावले उचलली आहेत. व्हिसा संपल्यानंतरही बेकायदेशीरपणे राहणाऱ्या आणि अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या विदेशी नागरिकांना शोधून काढण्यासाठी आता 'डायनॅमिक इमिग्रेशन सिस्टीम' कार्यान्वित करण्यात येणार असल्याचं प्रश्नोत्तराच्या तासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सांगितलं. अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये वारंवार सामील असणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांना देण्यात आल्या आहेत. नियमांचं वारंवार उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्स किंवा आस्थापनांचे परवाने केवळ निलंबित न करता ते कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी कायद्यात सुधारणा आणली जात असून अंमली पदार्थ विक्रीत सामील असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना थेट बडतर्फ केलं जाईल असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

<u>इंट्रो-ज्ञानभारतम्</u>

देशभरात विविध ठिकाणी विखुरलेली महत्त्वपूर्ण हस्तलिखितं एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र सरकारनं ज्ञानभारतम् हा प्रकल्प सुरू केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला गेल्या सोमवारपासून प्रारंभ झाला आहे. त्याविषयी माहिती देणारा हा वृत्तांत...

<u>स्क्रिप्ट:</u>

देशाच्या मौल्यवान हस्तलिखित वारशाचं सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन आणि प्रसार करण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं गेल्या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात ज्ञानभारतम् प्रकल्पाची घोषणा केली होती. या प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला आता सुरुवात झाली आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांचीही महत्त्वपूर्ण भूमिका असेल. महाराष्ट्रात या प्रकल्पासाठी नागपूरचं कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, आणि पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, आनंद आश्रम संस्थान आणि भारत इतिहास संशोधक मंडळाची, स्वतंत्र केंद्र म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, काम पाहणार आहे. या सर्वेक्षणासाठी "**Gyan Bharatam**" हे मोबाईल अॅप विकसित करण्यात आलं आहे. ठिकठीकाणची मंदिरं, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठ, ग्रंथालय, शैक्षणिक संस्था आणि खाजगी संग्राहकांना या सर्वेक्षणात सहभागी करून घेतलं जाणार आहे. भारतीय ज्ञानपरंपरेच्या दृष्टीनं महत्त्वाची हस्तलिखिते कुणाकडे असतील तर त्याची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल ॲप वर अपलोड करावी असं आवाहन शासनानं केलं आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे

हॅकाथॉन

कृषी विभाग आणि प्रमुख कृषी संस्थांद्वारे संयुक्तपणे 'दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ॲग्री हॅकाथॉनचं पुण्यातील कृषी महाविद्यालयात १५ ते १७ मे या कालावधीत आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अधिकाधिक स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधन आणि तांत्रिक परिवर्तनाला गती देण्यासाठी या उपक्रमाचं आयोजन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचं सक्षमीकरण, उत्पादकता वाढविणं आणि अन्न सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. उद्योजक, शासन आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन शेतीच्या भविष्यासाठी स्वस्त आणि नाविन्यपूर्ण उपाय तयार करावेत, यावर या हॅकाथॉनचा भर असणार आहे. या स्पर्धेत विजेत्याला २५ लाख रुपये आणि उपविजेत्याला १५ लाख रुपयांचं बक्षीस दिलं जाणार आहे. याशिवाय निवडक प्रकल्पांना मार्गदर्शन आणि निधी मिळवून देण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

निधन-काकडे

ज्येष्ठ कवयित्री आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या आसावरी काकडे यांचं काल पुण्यात अल्पश: आजारानं निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. संवेदनशील लेखन शैली, काव्यातील भावविश्व आणि सामाजिक जाणीवा यामुळे असावरी काकडे यांना मराठी साहित्य विश्वास विशेष मानाचं स्थान मिळालं होतं. त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना साहित्य अकादमी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. बोल माधवी, आरसा , आकाश, लाहू ,मी एक दर्शन बिंदू, राहटाला पुन्हा गती दिली मी, स्त्री असण्याचा अर्थ ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. राज्य शासनाच्या विविध पुरस्कारांसह अनेक मानाच्या पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आलं होतं.

आंबाकाजू

वातावरणातील बदलामुळे कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकणातील सर्वच लोकप्रतिनिधींची बैठक बोलवली होती. कोकणातील आंबे आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना राज्यसरकारने भरीव मदत देण्याची मागणी यावेळी करण्यात आली असल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी सांगितलं.

पाऊस

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये काल वादळी वारे आणि गारपिटीसह पाऊस झाला. वीज पुरवठा खंडित झाला, द्राक्षं, गहू, ज्वारी, हळद, टरबुज, खरबुज, पपई, केळी इत्यादि पिकांचंही यामुळं नुकसान झालं. सांगली, सोलापुर, परभणी, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांच्या विविध भागांमध्ये या पावसाची नोंद झाल्याचं आमच्या बातमीदारांनी कळवलं आहे.

## हवामान

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि वेगानं सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका पाऊस आणि वेगानं सोसाट्याचे वारे वाहण्याची दाट शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**